# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विषयी

भिडे कुलवृत्ताची संकल्पना प्रथम ग्वाल्हेर येथे राहणारे गोविंद कृष्ण भिडे यांच्या मनात आली आणि त्यांनी कामाला सुरुवात केली पण त्यांच्या निधना नंतर पुण्याला भिडे मंडळाची स्थापना होऊन या कामाला पुन्हा सुरुवात झाली. पुढे १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमुळे या कामात खंड पडला. १९५० साली पुण्याला केसरीवाडा येथे भिडे कुलबंधूंची सभा होऊन वासुदेव विद्याधर भिडे यांनी भिडे कुलवृत्ताची प्रथम आवृत्ती संपादनाची जबाबदारी स्वीकारली. त्यांना पुण्यातील नरसिंह चिंतामण भिडे व जनार्दन नरसिंह भिडे यांनी तसेच अनेक कुलबंधूंनी मदत केली.

११ जानेवारी १९५३ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात भिडे कुलवृत्ताची प्रथम आवृत्ती प्रख्यात साहित्यिक प्रा. श्री. म. माटे यांच्या हस्ते प्रकाशित झाली. त्या वेळेस माजी न्यायमूर्ती श्री. म. वि. भिडे हे अध्यक्षस्थनी होते. आपल्या भाषणात प्रा. श्री. म. माटे म्हणाले की, ''माझा भिडे कुलाशी असणारा संबंध आजोळकडून असून मी या समारंभाच्या निमित्ताने माझ्या आजोळीच आलो आहे.

१९५३ च्या पहिल्या आवृत्ती नंतर काम खंडित झाले. पहिल्या कुलवृत्ताव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावांने न्यासाची स्थापना केली.

नोव्हेंबर १९९८ मध्ये प्रभादेवी मुंबई येथील सिद्धी विनायकाच्या मंदिरात भिडे मंडळींची एक सभा झाली. सभेला सुमारे २३ते २४ भिडे हजर होते. त्या सभेत नित्युंदन गोत्रीय भिडे मंडळींची एक स्वत:ची संस्था (न्यास) निर्माण करून त्या संस्थेचे नांव ''नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'' असे निश्चित करण्यात आले. ह्या सभेतील उपस्थितांपैकी ११ जणांनी प्रत्येकी १००१/- रुपये देऊन ११,०११/- रुपये इतका न्यास निधी म्हणून नोंद झाली. ह्या न्यासासाठी संस्थापक /विश्वस्त मंडळाची स्थापना करून ६ विश्वस्तांची निवड करण्यात आली आणि सर्वानुमते श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे ह्यांची प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती अनेक अडचणींचा सामना करत, नऊ वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर पूर्ण झाली. संपादक श्री. प्रभाकर भिडे, श्री. दामोदर भिडे आणि श्री. विनायक भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्याच्या विद्याकर भिडे व दिलीप भिडे आणि ठाण्याच्या चिंतामणी भिडे, अतुल भिडे, व्यंकटेश भिडे आणि रमेश भिडे या संपादक मंडळाच्या प्रयत्नांनी हे शक्य झाले.

१३ जानेवारी २००८ रोजी पुण्यातील केसरी वाड्यातील लोकमान्य सभागृहात भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती संत वाङ्मयाचे अभ्यासक प्रा. राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रगाशित झाली. त्यावेळेस अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. प्रदीप भिडे होते.

दुसऱ्या सुधारित कुलवृत्ताची प्रत आपल्यासमोर ठेऊन नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांपैकी एक मोठे आणि महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे याचा आनंद आणि समाधान आपणा सर्वांना होत आहे. मात्र यापुढील उद्दिष्टपूर्तीची वाटचाल आणि यशस्विता याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. यासाठी भिडे कुलबंधूंपैकी अनुभवी, सार्वजनिक कामाची आवड व माहिती असणाऱ्या कुलबंधूंनी आणि विशेषत: तरूणवर्गाने पुढे यावे आणि प्रतिष्ठानची वरील उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठीच्या कार्यात सहभाग घ्यावा.

नित्यंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने वाढावे यासाठी आर्थिक आणि अन्य सर्व प्रकारचे सहाय्य सर्व भिडे कुलबंधू कडून अपेक्षित आहे. कारण हे प्रतिष्ठान 'आपण आपल्यासाठी' निर्माण केलेले आहे आणि ते आपल्यासाठीच आहे हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे.

## भिडे कुलवृत्त प्रथम आवृत्तीतील निवडक . . .

चितेपासून झालेले म्हणून चित्पावन म्हणावे किंवा कोकणस्थांविषयी अभिमान व्यक्त करावयाचा तर 'ज्यांचे चित्त पावन म्हणजे पवित्र ते चित्पावन अशी व्युत्पत्ती लढविता येईल. वास्तविक हे दोन्ही प्रकारचें शब्द साधन काल्पनिक आहे. पण चित्पावनांच्या गुणावगुणमिश्रणाचा नियम मात्र अनुभवसिद्ध होय.'

'गुणी गुणं वेत्ति' या वचनाप्रमाणे कोकणस्थ असणाऱ्या बाळाजी विश्वनाथांना मराठी राज्याच्या पंतप्रधानपदी नियुक्त केले. लेखणी व तलवार दोन्ही, कोकणस्थांनी गाजविली. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत, चाफेकर, कान्हेरे, बापट, टिळक असे अनेक क्रांतिकारक कोकणस्थांत निर्माण झाले. प्रसंगी प्रवाहाविरुद्ध जाऊन क्रांतिकारी विचार मांडणारे व त्याप्रमाणे आचरण करणारे अनेकजण कोकणस्थच होते. गायीला उपयुक्त पशू मानणारे वि. दा. सावरकर, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी कर्वे, महात्मा फुले यांना आपल्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढू देण्याचे धैर्य दाखविणारे 'भिडे' हे सर्व कोकणस्थच. अत: भिड्यांचा इतिहास हा कोकणस्थांच्या किंवा चित्पावनांच्या इतिहासापेक्षा वेगळा असू शकत नाही.

**(प्रथम आवृत्तीचे संपादक - वासुदेव विद्याधर भिडे)**

## भिडे कुलवृत्त द्वितीय आवृत्तीतील निवडक . . .

'मी कोण ?' (कोऽहम्) हा प्रश्न प्रत्येक माणसाच्या आयुष्यात केव्हातरी पडतो. आपण जो काळ या जगामध्ये व्यतीत करतो त्यामध्ये प्रत्येक गोष्टीत 'याचा फायदा किंवा उपयोग काय?' असे प्रश्न विचारणे म्हणजे आपले आपल्यापुरतेच जगणे म्हणावे लागेल.

कुलवृत्त तयार करण्यासाठी बराच कालावधी लागला. त्यासाठी सातत्याने अनेक ज्येष्ठ व तरूण मंडळींनी आपल्या दैनंदिन कार्यालयीन कामाप्रमाणे येऊन हे काम पूर्ण केले. त्याकरिता प्रथम कार्यकारिणी व नंतर संपादक मंडळाने अथक प्रयत्न केले म्हणून हे किचकट व न संपणारे काम विशिष्ट टप्प्यापर्यंत होऊ शकले.

या कुलवृत्तामुळे बऱ्याच भिडे बांधवांना आपल्या सख्ख्या नात्यापलीकडील नातेमंडळी माहीत झाली, ती काय करतात ते कळले तर थोडीफार आपुलकी, आपलेपणा वाढण्यास मदत झाली तसेच गरजू भिडे मंडळींना, आर्थिक व इतर बाबतीत सुदृढ असलेल्या मंडळींनी थोडीफार मदत केली तर या कुलवृत्ताचा उद्देश सफल झाला असे वाटेल, कारण समाज एकत्र यावा, एकमेकांच्या उपयोगी पडावा, सर्वांनी प्रगतीचा प्रयत्न करावा ह्याच अपेक्षेने हे केले आहे.

हा पहिला टप्पा पूर्ण झाला असला तरी भिडे प्रतिष्ठानची बाकीची उद्दिष्टे साध्य व्हायची आहेत. मी विशेषत: तरुण मंडळींना आवाहन करतो की, त्यांनी पुढे येऊन भिडे प्रतिष्ठानचे काम करावे आणि भिडे कुलबंधूंची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करावेत.

१९५३ साली प्रकाशित झालेल्या कुलवृत्तमध्ये मागील दहा ते चौदा पिढ्यांचा मागोवा घेतलेला आपणाला दिसेल. त्यानंतर गेल्या पन्नास/बावन्न वर्षात आणखी तीन ते चार पिढ्यांच्या अस्तित्वाची मालिका आपण त्यांना जोडली आहे. गेल्या तीनशे/चारशे वर्षातील भिडे कुटुंबीयांच्या अस्तित्वाची मालिका कुलवृत्ताच्या माध्यमातून इतिहासाच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा हा आपला प्रयत्न आहे. भिडे बंधूंच्या (विशेषत: कार्यकारिणी व संपादक मंडळाच्या) कार्यामागची मूलगामी आणि व्यापक तळमळ आपण समजून घेतल्याने हा प्रयत्न यशस्वी झाला, हे मी आनंदाने नमूद करतो.

**श्री. प्रदीप भिडे (अध्यक्ष)**

आपल्या भारतीय समाजाचा इतिहास 'शब्दबद्ध करणे' (Documentation) या संकल्पनेच्या बाबतीत समाजमनामध्ये बऱ्याचदा औदासीन्य आढळून येते. याचा उल्लेख या पूर्वीही इथे केला आहे. स्वत:ला विद्येच्या वारशाचा अभिमान बाळगणाऱ्या कोकणस्थ ब्राह्मणांना, त्यांच्या पाचशे वर्षापूर्वीच्या इतिहासाविषयी माहिती नसणे, हा औदासीन्याचाच परिणाम आहे. त्या दृष्टीने अशा कुलवृत्ताचे महत्व वादातीत आहे.

**डॉ. सतीश भिडे (आय्. ए. एस्)**

कुलवृत्त लिहिण्यामागे भिडे कुटुंबात आत्मीयता अधिक प्रमाणात निर्माण करावी हीच एक इच्छा आहे. एकमेकांविषयी माहिती व्हावी, परस्पर सहवास व सहकार्य वाढावे की ज्यातून आपुलकी वृद्धिंगत व्हावी.

**श्री. प्रभाकर भिडे (द्वितीय आवृत्ती संपादक)**